**विशेष दिवाणी दावा क्र. २६/२०१४ मधील नि.१०० खालील आदेश**
**मे.रतन मेटल्स तर्फे प्रोप्रा. वि. मे.यश एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा.**
**CNR NO. MHST050002252014**

वादीने सदरचा अर्ज त्याचेविरुध्द झालेला “उलटतपास नाही” चा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वादीने रक्कम वसुलीकरीता दाखल केला आहे. सदरचे प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता आहे. प्रतिवादीतर्फे वटमुखत्यार यांनी नि.८१ वर सरतपास दि.२८.०१.२०२० रोजी दाखल केला आहे. कोविड–१९ या साथीचे प्रादुर्भावामुळे वादीला कोर्टात उपस्थित राहता आले नाही. दि.०४.०२.२०२१ रोजी वादीचे वकील यांचे अन्य कोर्टात काम सुरु असलेमुळे वकीलांना वेळेत मे.कोर्टात उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे दि.०४.०२.२०२१ रोजी वादी विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत झालेला आहे. तद्नंतर देखील वादी हे व्यवसाया निमित्त वारंवार परगावी असलेने, सदरकामी झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करुन घेणेस वादीस वेळेत शक्य झाले नाही. वादीतर्फे प्रतिवादीचा उलटतपास होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे न्यायदानास मदत होणार आहे. म्हणून वादीने सदरचा अर्ज दाखल करुन उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून प्रतिवादी साक्षीदार यांचा उलटतपास घेणेची परवानगीकरीता दाखल केला आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे नि.१०३ ला म्हणणे दाखल करण्यात आले आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींतर्फे वटमुखत्यार याचा नि.८१ वर सरतपास दि.२८.०१.२०२० रोजी दाखल करण्यात आलेला आहे. वादी यांनी प्रतिवादीतर्फे मुखत्यार यांचा उलटतपास घेतलेला नाही, म्हणून दि.०४.०२.२०२१ रोजी उलटतपास

नाही असा आदेश पारीत झालेला आहे. वादीस उलटतपास घेण्यासाठी मे.कोर्टाने योग्य व पुरेशी म्हणजे सुमारे एक वर्षाचा कालावधी दिलेला होता. परंतु वादीने जाणूनबुजून काम लांबविण्यासाठी व प्रतिवादींना त्रास देण्यासाठी प्रतिवादी यांचा उलटतपास घेतलेला नव्हता. सदरील दावा हा अंतिम युक्तीवादावर असताना वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादी व वादीचे वकील वारंवार कोर्टात हजर असताना देखील वादीने जाणूनबुजून सदरील आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दिलेला नव्हता. प्रतिवादी यांना मानसिक व आर्थिक त्रास देण्यासाठी वादीने जाणूनबुजून सदरील आदेश रद्द करुन घेतलेला नाही व सुमारे ४ वर्षाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे. यदाकदाचित सदर अर्ज मंजूर करण्याचे मे.कोर्टाचे मत झालेस नुकसान भरपाई म्ळणून र.रु. २५,०००/– दंड करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता आहे. वादीचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. सदर प्रकरण गुणदोषावर निकाली निघणेकरीता वादीला संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) दि.०४.०२.२०२१ रोजी वादीविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.12.16 10:40:44 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः १५.१२.२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.